आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी - वेळ सायंकाळी ०६.००)

गुरुवार, दिनांक०२ फेब्रुवारी २०२३

ठळक बातम्या

1. नागपूर शिक्षक मतदार संघ निवडणुकीत महाविकास आघाडीचे सुधाकरअडबाले आणि अमरावती पदवीधर मतदार संघ निवडणुकीत महाविकास आघाडीचेच धिरज लिंगाडे आघाडीवर
2. उद्यापासून वर्ध्यात अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला प्रारंभ, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे करणार उद्घाटन.
3. राज्यातील सर्व बाल सुधारगृहात कौशल्यविकास केंद्र सुरू करणार-महिला आणि बालविकास मंत्री मंगलप्रभात लोढायांची माहिती.
4. भारतीय अन्न महामंडळाच्या ई लिलावात पहिल्याच दिवशी ८ लाख मेट्रीक टन गव्हाची विक्री.

********

विधानपरिषद

राज्यातल्या विधानपरिषदेच्या ३ शिक्षक आणि २ पदवीधर मतदारसंघांची मतमोजणी आज होते आहे. विधानपरिषदेच्या नागपूर विभाग शिक्षक मतदार संघ निवडणूकित आता पर्यंत २८ हजार मतपत्रिकांची मोजणी पूर्ण झाली असून पहिल्या पसंतीची सर्वाधिक मतं महाविकस आघडीचे उमेदवार सुधाकर अडबाले यांना १४,०६९ इतकी मिळाली आहे. यानंतर भाजपाचे नागो गाणार यांना मतं पडली आहे.आज सकाळपासून मतमोजणीस सुरुवात एकूण ३४,३६० मत पत्रिकांपैकी २८ टेबलवरील मत मोजणी घेण्यात आली. पहिल्या फेरीत २६,९०१ वैध मत होती तर १,०९९ अवैध मत होती. दुसऱ्या फेरीची मतमोजणी सुरु झाली आहे. या फेरीत ६,३६० मतपत्रिका मोजण्यात येत आहेत.पहिल्या पसंतीच्या मतांच्या मोजणी नंतर भाजपचे नागो गाणार यांना ६,३६६ मतं पडली. दरम्यान अमरावती पदवीधर मतमोजणीत 56 हजार मतांच्या मोजणीनंतर मविआचे धीरज लिंगाडे 1480 मतांनी आघाडीवर आहे.याठिकाणी धिरज लिंगाडे यांना 23 हजार 795 तर डॉ. रंजीत पाटील यांना 22 हजार 315 मतं मिळाली आहेत.नाशिक पदवीधरमतदारसंघासाठी मतमोजणी सुरू आहे. दरम्यान कोकण विभाग शिक्षक मतदारसंघाच्या द्वैवार्षिक निवडणुकीत भाजपचे उमेदवार ज्ञानेश्वर म्हात्रे पहिल्या पसंतीच्या क्रमानुसार विजयी झाले आहेत.

## साहित्य संमेलन

विदर्भ साहित्य संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त वर्ध्यामध्ये अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. उद्या शुक्रवारी ३ फेब्रुवारी रोजी साहित्य संमेलनाला प्रारंभ होत आहे. संमेलनादरम्यान विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. साहित्य संमेलनस्थळाला महात्मा गांधी साहित्य नगरी असे नाव देण्यात आले आहे. वर्ध्यातील स्वावलंबी विद्यालयाच्या विस्तीर्ण मैदानावर ९६ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होत आहे.महात्मा गांधी साहित्य नगरीत प्राचार्य राम शेवाळकर व्यासपीठावर सकाळी १०.३० वाजता उद्घाटन समारंभ आयोजित आहे. संमेलनाध्यक्ष न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर, पूर्वाध्यक्ष भारत ससाणे यावेळी उपस्थित राहतील. उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होईल. यावेळी स्वागताध्यक्ष माजी खासदार दत्ता मेघे, प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी उपस्थित राहतील. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. विश्वनाथप्रसाद तिवारी, डॉ. कुमार विश्वास, विशेष अतिथी आमदार डॉ. विश्वजीत कदम, डॉ.पी.डी. पाटील, डॉ. डी.वाय. पाटील उपस्थित राहतील. उद्या सकाळी आठ वाजता महात्मा गांधीजींच्या पुतळ्यापासून ग्रंथदिंडीला सुरूवात होणार आहे. ग्रंथदिंडीमध्ये विविध शाळा, विद्यार्थी सहभागी होतील. ग्रंथदिंडीदरम्यान वर्ध्यातील विविध महत्वाच्या स्थानांच्या झाँकी राहणार आहेत. यावेळी शासनाच्या विविध विभागांच्याही झाँकी राहतील. साहित्य संमेलनाकरिता वर्धा नगरी सज्ज झाली आहे.

## अमरावती विद्यापीठ

संत गाडगे बाबा अमरावतीविद्यापीठाच्या हिवाळी **-2022** च्या**3** व**4** फेब्रुवारीरोजीनियोजित सर्व विषयांच्या परीक्षा विद्यापीठाने रद्द केलेल्या आहेत. याबाबत सर्वप्राचार्य, केंद्राधिका-यांनापत्राव्दारे परीक्षा विभागाने कळविले आहे. महाराष्ट्र राज्य विद्यापीठ वमहाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समितीने विविध मागण्यांसाठी सुरू असलेल्या पदवी, पदव्युत्तरअभ्यासक्रमाच्या परीक्षांच्या कामकाजावर बहिष्कार घातला आहे. सदर आंदोलनातविद्यापीठ तसेच महाविद्यालयांमधील शिक्षकेत्तर अधिकारी, कर्मचारी सहभागी झालेलेअसल्यामुळे विद्यापीठाच्या सुरु असलेल्या**3** व**4** फेब्रुवारी, **2023** रोजीच्या सर्वच विषयांच्या परीक्षा रद्द करण्याचा निर्णय विद्यापीठानेघेतला आहे.

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

राज्यातील बाजार समित्यांमध्ये येणाऱ्या शेतकऱ्यांना अद्यावत सुविधा मिळाव्यात यासाठी सर्व बाजार समित्यांच्या पायाभूत सुविधांचा तपशीलवार आराखडा तयार

करण्याचे  निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.राज्याच्या पणन विभागाची आढावा बैठक मुख्यमंत्री  शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली काल झाली तेव्हा ते बोलत होते.काळाची गरज लक्षात घेऊन बाजार समित्यांचा पुनर्विकास, तिथं येणारे शेतकरी, मजूर, कामगार यांच्यासाठी सुविधा निर्माण कराव्यात असे निर्देशही शिंदे यांनी दिले. या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी पाण्याची उपलब्धता, स्वच्छता, अंतर्गत रस्ते बांधणी आणि इतर सुविधांचा आराखडाही तयार करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

अंगणवाडी मदतनीस

राज्यातल्या अंगणवाडी मदतनीस आणि सेविकांची अंतिम निवड करण्याचा अधिकार बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांकडे देण्यात आला आहे. केंद्र सरकारच्या नवीन मार्गदर्शक सूचनांनुसार, सेविकांसाठी शैक्षणिक पात्रता दहावीऐवजी बारावी करण्यात येणार असून, त्यासंबंधीच्या शासन निर्णयाला अंतिम मान्यता मिळाल्यानंतर तात्काळ भरतीला सुरवात होणार असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

महिला व बाल विकास मंत्री-मंगलप्रभात लोढा

बालकांना शिक्षणासोबतच आवश्यक कौशल्य विकसित होण्यासाठी कौशल्य विकास विभाग आणि महिला व बालविकास विभाग प्रयत्नशील आहे. मुंबई इथल्या चिल्ड्रन एड सोसायटीचे डोंगरी येथील निरीक्षण गृह व मानखुर्द येथील बालगृह येथे नव्याने सुरू केलेल्या कौशल्य विकास केंद्राच्या धर्तीवर राज्यातील बाल सुधारगृहांमध्ये कौशल्यपूर्ण शिक्षणाचे केंद्र सुरू करणार आहोत. त्याचबरोबर भव्यता फाऊंडेशनच्या सहकार्याने डोंगरी व मानखुर्द येथील मुलांना त्यांचा कल लक्षात घेवून मानखुर्द आणि डोंगरी येथील मुलांसाठी कौशल्य प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यात येणार आहेत अशी माहिती, कौशल्य, रोजगार व उद्योजकता आणि महिला व बाल विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिली.डोंगरी, उमरखाडी येथील चिल्ड्रन एड सोसायटीमध्ये कौशल्य विकास केंद्राच्या उद्घाटनप्रसंगी मंत्री लोढा बोलत होते.

राजा बढे

कविवर्य राजा बढे लिखित ‘जय जय महाराष्ट्र माझा’ या गीताला राज्य गीताचा दर्जा देण्याचा शासन निर्णय काल जारी झाला. या मूळगीतातले दोन चरण राज्यगीत म्हणून घोषित करण्यात आले असून, येत्या १९ फेब्रुवारी पासून म्हणजेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती दिनापासून हा निर्णय लागू होईल. सर्व शासकीय कार्यक्रमांमधे १ मे रोजी महाराष्ट्र दिनानिमित्त होणाऱ्या ध्वजारोहण कार्यक्रमात

शाळांमधे दैनिक सत्र सुरु होण्यापूर्वी राष्ट्रगीतावर हे राज्यगीत गायलं किंवा वाजवलं जाईल.

समितीचं पुनर्गठन

राज्यातल्या कलापथकांना भांडवली तसंच प्रयोगासाठी अनुदान मंजूर करणाऱ्या समितीचं पुनर्गठन करण्यात आलं आहे. सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक हे समितीचे अध्यक्ष असून या समितीचा कार्यकाळ तीन वर्षांचा असेल. ही समिती कलापथकांच्या अर्जाची छाननी करणे, त्यांची पात्रता तपासून अनुदान मंजूर करण्याचं काम करणार आहे.

तृणधान्य

आंतरराष्ट्रीयतृणधान्य वर्षानिमित आहारात तृणधान्य वापरा बाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी भंडारा जिल्हा कृषि विभागामार्फत **3** ते **4** फेब्रुवारी रोजी सकाळी **9.30** वाजता क्रिडा व सांस्कृतीक कार्यक्रमाचे व रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.

संसद

अदानी उद्योगसमूहाबाबत हिंडेनबर्ग संस्थेने प्रकाशित केलेल्या अहवालावरुन संसदेच्या दोन्ही सभागृहांमधे विरोधकांनी प्रचंड गदारोळ केला. त्यामुळं दोन्ही सभागृहांचं कामकाज सुरुवातीला २ वाजेपर्यंत आणि नंतर संपूर्ण दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.लोकसभेत काँग्रेस, तृणमूल काँग्रेस आणि द्रमुकच्या सदस्यांनी सभागृहाचं कामकाज सुरु होताच याप्रकरणी चौकशीची मागणी करत हौद्यात धाव घेतली. सदस्यांनी आपापल्या जागी परत जावं असं सभापती ओम बिरला यांनी वारंवार सांगूनही हे सदस्य हौद्यातूनच घोषणा देत राहिले. गोंधळामुळे कामकाज चालवणं अशक्य झालं तेव्हा सभागृहाचं कामकाज सुरुवातीला **2** वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी स्थगित झालं.राज्यसभेत अनेक सदस्यांनी स्थगन प्रस्तावाची नोटीस दिली होती. भारतीय आयुर्विमा महामंडळ, आणि सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांनी पैसा गुंतवलेल्या कंपन्यांचे समभाग बाजारात कोसळत असल्याबद्दल चर्चेची मागणी करणारा हा स्थगन प्रस्ताव होता. हा प्रस्ताव योग्य पद्धतीने मांडला नसल्याचं कारण देऊन अध्यक्ष जगदीप धनखड यांनी तो फेटाळून लावला. मात्र घोषणाबाजी चालूच राहिल्याने सभागृहाचं कामकाज सुरुवातीला दुपारी दोन वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब करावं लागलं

ई-लिलाव

भारतीय अन्न महामंडळाने देशांतर्गत खुल्या बाजारात पहिल्याच दिवशी **8** लाख मेट्रीक टन गव्हाची विक्री केली. देशातल्या **22** राज्यांमधे ई- लिलाव पद्धतीने ही विक्री झाली. केंद्रीय साठ्यातल्या एकूण **25** लाख मेट्रीक टन गव्हापैकी **22** लाख मेट्रीक टन गहू अन्न महामंडळानं लिलावाद्वारे विक्रीला काढला आहे. देशभरात गहू आणि गहूपिठाचे दर वाढत असल्याच्या पार्शवभूमीवर त्यावर नियंत्रण ठेवण्याकरता हा लिलाव केला जात असल्याचं केंद्रीय अन्न आणि नागरी पुरवठा मंत्रालयानं सांगितलं आहे. येत्या मार्चच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत दर बुधवारी हा लिलाव होणार असल्याचं सरकारी पत्रकात म्हटलं आहे.

हवामान

नागपुरात थंडीत किंचित वाढ झाली असून, आज सकाळी विमानतळावर १२.७ अंश सेल्सिअस इतके किमान तापमान नोंदविण्यात आलं आहे.

***